# दानिएलप्रमाणे आम्ही देवाशी बोलतो

मुलांना शिकवणाऱ्यांनी P6b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थनाः** ''प्रिय स्वर्गीय पित्या, तुझ्या कळपाने तुझा शोध करून आमच्या प्रत्येक गरजेसाठी तुझ्याशी सदोदित बोलावे यासाठी त्यांचे मार्गदर्शन करव्याकरिता मला सूज्ञता व सचोटी कृपा करून दे.''

## 1. विश्वासाने प्रार्थना करणाऱ्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी तुमच्या अंतः करणाची तयारी करा.

पाहा पवित्र शास्त्रामध्ये विश्वासणाऱ्यांच्या प्रार्थना दिल्या आहेत. पुढील विश्वासणाऱ्यांच्या प्रार्थनेचे वैशिष्ट्य लिहा:



**दानीएल**

शलमोन, 2 इतिहास 6:12–17

याबेस, 1 इतिहास 4:9 व 10

हन्ना, 1 शमुवेल 1:9–13

दावीद, 2 शमुवेल 7:18–22

दानीएल, दानीएल 9:3–19

ख्रिस्ती लोक, प्रे. कृ. 4:24–30

टीपः उभे राहून, बसून, गुडघे टेकून किंवा खाली झोपून, आम्हांला मोठयाने अथवा मनातल्या मनात प्रार्थना करता येते.

**पाहाः** पवित्र शास्त्रामध्ये आम्ही कशी प्रार्थना करावी अशी देवाची इच्छा आहे:

- गुप्तपणे, मत्तय 6:5–8 टीपः ख्रिस्ती लोकांनी नेहमीच देवाने पाहावे व ऐकावे याच उद्देशाने प्रार्थना करावी इतर लोकांनी पाहावे व ऐकावे अशा हेतूने कधीच प्रार्थना करू नये.
- इतरांना क्षमा करणे, मत्तय 6:9–15 टीपः ख्रिस्ती लोकांच्या हातून अनेक चुका होतात आणि खूपशी पातके घडतात, म्हणून त्यांनी देवाकडे पापांच्या क्षमेसाठी प्रार्थना केली पाहिजे. परंतु आमचा अपराध करणाऱ्याला आम्ही क्षमा करतो तेव्हाच देव आम्हांला क्षमा करतो.
- पश्चाताप करून, लूक 18:10–14 टीपः देवाला आपल्या प्रार्थनांचे उत्तर द्यायला लावण्या इतके चांगुलपण कोणाकडेच नाही म्हणूनच, आम्ही प्रार्थना करताना आमच्या चुका पदरी घेतल्या पाहिजेत तसेच आम्ही खूप चांगले आहोत अशी फुशारकी मारू नये.
- अधीन पत्नी व सौम्य पतींप्रमाणे, 1 पेत्र 3:1–9 टीपः आम्ही आमच्या जोडीदारांशी वागतो तशीच वागणूक आमचा स्वर्गीय पिता आम्हांला देईल.
- उपकारस्तुतीसह, 1 थेस्सल 5:16–18 टीपः देव चांगलाच आहे आणि आमच्या भल्यासाठी तो नेहमीच प्रांजळ प्रार्थनांची उत्तरे देतो.

ख्रिस्ती प्रार्थना ही इतर धर्मातील प्रार्थनां पेक्षा कशी वेगळी आहे ते पवित्र शाश्त्रा **पाहाः**



- येशूचे नाव वापरून योहान 15:16; 16:24
- पवित्र आत्म्याच्या द्वारे, यहूदा 20 व 21
- देवाला पिता अशी हाक मारून, मत्तय 6:9

विश्वासणाऱ्यांनी देवाकडे कोणत्या गोष्टी मागाव्यात ते पवित्र शास्त्रातील पुढील वचने पाहून लिहा:

मत्तय 6:9-13

प्रे. कृ. 4:27-30

इफिस. 1:15-20

याकोब 1:2-5

याकोब 5:13-16

दानीएल 6 वाचून पुढील गोष्टी लिहा:

- वचने 6:1-4 मध्ये दारयावेश राजाचे अधिकारी दानीएलाचा मत्सर का करीत
- वचने 5-9 मध्ये दानीएलाला ठार करण्याची अधिपतींची दुष्ट योजना
- वचने 10-11 मध्ये त्यांचे कपट कारस्थान समजल्यावर दानीएलाने काय केले.
- वचने 12-15 मध्ये दुष्ट माणसांनी राजाची मान्यता मिळवण्यासाठी कसा दबाव आणला.
- वचने 16-22 मध्ये दानीएलला वाचवण्यासाठी देवाने काय केले.
- वचने 23-24 मध्ये दारयावेश राजाने दुष्ट माणसांचे काय केले.
- वचने 25-28 मध्ये देवाचे गौरव करण्यासाठी दारयावेश राजाने काय केले.



*सिंहाच्या गुहेत दानीएल*

2. **तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवडयातील कार्यक्रम ठरवा. मंडळीतील गरजू सभासदांची भेट छेऊन त्यांच्या बरोबर प्रार्थना करण्यासाठी व्यवस्था करा.**

जिथे थोडके किंवा अजिबातच ख्रिस्ती लोक नाहीत अशा ठिकाणी जाऊन लोकांसाठी प्रार्थना करा.

त्यांना आशीर्वाद दण्यास देवाला विनंती करा तसेच कोणती कुटुंबे सुवार्तेवर विश्वास ठेवण्यास तयार आहेत ते देवाला तुम्हांला दाखवण्यास सांगा, नवीन विश्वाणाऱ्यांची भेट धेऊन त्यांना कुटुंब या नात्याने व वैयक्तिक प्रार्थना कशी करायचे ते सांगा.

3. **तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनासभेची योजना आखा.**

सध्याच्या गरजा व स्थानिक रिवाज ह्यांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

दानीएल अध्याय 6 मधुन दानीएलाचा वृत्तांत सांगा किंवा नाटयीकरण करा.

भाग 1 मधील विषयावरील प्रश्न विचारा.

मुलांना त्यांनी तयार केलेली नाटिका, कविता व प्रश्न सादर करू द्या. येशूने मत्तय 6:9-13 मध्ये शिकवलेली प्रार्थना मंडळीला एकत्रितपणे म्हणायला सांगा.

मंडळीला प्रार्थना करण्यास शिकवा, भाग 1 मध्ये दिलेले पवित्र शास्त्रातील संदर्भ उलगडून सांगा आणि त्यांच्या गरजांसाठी प्रार्थना करण्यास मार्गदर्शन करा.

एक कुटुंब म्हणून आणि वैयक्तिक रित्या विश्वासणाऱ्यांनी दररोज प्रार्थना करावी यासाठी प्रोत्साहन द्या.

पाठ करा 1 थेस्सल 5:17 ''निरंतर प्रार्थना करा.''

**प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी:** दानीएल अध्याय 1 मधुन दानीएलच्या तीन मित्रांनी तेव्हा देवाच्या नियमाने मना केलेल्या अन्नापेक्षा अधिक चांगले अन्न कसे निवडले ते सांगा प्रभुभोजनाच्या वेळी आपण सर्वात उत्कृष्ट अन्न खातो हे स्पष्ट करून सांगा.

**वि श्वासणाऱ्यांना प्रार्थना करण्यास सांगा,** देवाला येशू जीवनाच्या भाकरी सर्व पातकांपासून शुद्ध करणारे त्याचे रक्त आणि त्यांना देवापासून मिळालेल्या इतर सर्व चांगल्या गोष्टी यासाठी धन्यावाद द्या.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net